## नियमित दिवाणी दावा क्र. २३०/२०२३ मध्ये निशाणी क्र.५ कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादी क्र. १ महाराष्ट्र शासनतर्फे जिल्हाधिकारी, सातारा, प्रतिवादी क्र. २ उपजिल्हाधिकारी पुनर्वसन, सातारा, प्रतिवादी क्र. ३ उपविभागीय अधिकारी, उपविभाग पाटण, प्रतिवादी क्र. ४ उपविभागीय अधिकारी, उपविभाग कराड व प्रतिवादी क्र. ५ श्रीकृष्ण सुरेंद्र पवार यांच्याविरुद्ध दावा मिळकतीचा ताबा मिळण्याकरीता व तसेच निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरीता व दावा मिळकत कायदेशीररीत्या संपादन करुन संपादनाची नुकसान भरपाई वादींना अदा करण्याबाबत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना आदेश होण्याबाबत दाखल केला आहे. वादींनी प्रस्तुतचा निशाणी क्र. ५ कडील अर्ज प्रतिवादी क्र. ५ विरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) वादपत्राच्या परिच्छेद क्र. १अ मध्ये विशेषरित्या वर्णन केलेली मौजे माजगांव, ता. पाटण येथील शेतजमीन गट क्र. ३८४, क्षेत्र ३ हेक्टर १६ आर, पोटखराब ० हेक्टर ४ आर पैकी ० हेक्टर ८० आर ही मिळकत प्रस्तुत दाव्यातील वादाचा विषय आहे. सदर मिळकतीला याखाली सोईच्या दृष्टीने "दावा मिळकत" असे संबोधण्यात येते.

३) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार मौजे माजगांव, ता. पाटण येथील शेतजमीन गट क्र. ३८४, क्षेत्र ३ हेक्टर १६ आर, पोटखराब ० हेक्टर ४ आर ही मिळकत वादींची वडीलोपार्जित मालकी हक्क कब्जेवहीवाटीची मिळकत आहे. सदर मिळकत ही वादींचे वडील नथु गणपती पाटील यांच्या नावे सन २०१२ अखेरपर्यंत होती. वादींचे वडील नथु गणपती पाटील हे स्लॅब पात्र खातेदार होते. माजगांव, ता. पाटण हे गाव उत्तरमांड प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात येत असल्यामुळे वादींच्या वडीलांच्या खात्याला स्लॅब लागला होता.

४) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादींच्या वडीलांच्या नावे असलेल्या दावा मिळकतीच्या संपादनाबाबत विशेष भूसंपादन अधिकारी क्र. १२, सातारा यांनी भूसंपादन कायद्याचे कलम ४(१) ची नोटीस दिनांक १३/१२/२०११ रोजी दिली होती. परंतु दरम्यानच्या कालावधीत भूसंपादन कार्यालय १२ हे बंद झाल्याने माजगांव येथील संपादनाचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, उपविभाग पाटण यांच्याकडे वर्ग करण्यात आला. उपविभागीय अधिकारी, उपविभाग पाटण यांनी कलम ४ ची अधिसूचना दिनांक १ जुलै २०१३ रोजीच्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध केली. परंतु त्यानंतर कलम ६ प्रमाणेची अधिसूचना मुदतीत प्रसिद्ध झाली नसल्याने संपादनाचा प्रस्ताव व्यपगत झाला. त्यानंतर भूसंपादनाची कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. दावा मिळकत कायदेशीररीत्या संपादन न करता उपविभागीय अधिकारी, उपविभाग कराड यांचा कार्यालयीन आदेश क्र. उत्तरमांड/का.वि./१५/ २२/०१/२०१० नुसार सन २०१३ साली दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. ५ यांचे वडील सुरेंद्र धोंडीराम पवार यांना बेकायदेशीररित्या वाटप केली आहे.

५) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार दावा मिळकतीच्या संपादनाची कार्यवाही चालू होती. त्यावेळी वादींचे वडील सर्व काही पहात होते. वादींचे वडील दिनांक ०३/०३/२०१० रोजी मयत झाले आहेत. वादींच्या वडीलांच्या मृत्युपश्चात वादी हे कुटुंबाचा कारभार पाहू लागले. त्यावेळी वादींना दावा मिळकतीच्या बेकायदेशीर कब्जाची माहीती झाली. वादींनी त्यांच्या वडीलांच्या मृत्युपश्चात प्रतिवादींकडे दावा मिळकतीबाबत वेळोवेळी चौकशी करुन देखील प्रतिवादींनी वादींना दावा मिळकतीच्या कब्जाची किंवा संपादनाची कोणतीही माहीती दिली नाही. वादींनी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याकडे दावा मिळकतीच्या नुकसान भरपाईची लेखी मागणी करुन देखील प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादींना दावा मिळकतीच्या संपादनाची नुकसान भरपाई दिली नाही.

६) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ५ यांचा बेकायदेशीर ताबा आहे याची प्रतिवादी क्र. ५ यांना पूर्ण कल्पना असल्याने प्रतिवादी क्र. ५ यांनी दावा मिळकत बेकायदेशीररीत्या विक्रीस काढली आहे. प्रतिवादी क्र. ५ यांनी दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री केल्यास वादींचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. वादींनी शेवटी अशी विनंती केली आहे की, दावा मिळकत कायदेशीररीत्या संपादन केल्याशिवाय दावा मिळकत त्रयस्थ इसमास तबदील करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी क्र. ५ यांना देण्यात यावी.

७) प्रतिवादी क्र. ५ हा या कामी वकिलांमार्फत हजर झाला आहे. प्रतिवादी क्र. ५ ने निशाणी क्र. ३१ कडे त्याची लेखी कैफीयत व निशाणी क्र. ५ वरील अर्जास म्हणणे दाखल करुन वादींच्या दाव्यास विरोध केला आहे.

८) प्रतिवादी क्र. ५ च्या लेखी कैफीयतीमधील कथनानुसार भुसंपादनाच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करुन प्रतिवादी क्र. ५ यांना दावा मिळकतीचे सन २०१३ मध्ये वाटप झाले आहे. मौजे गमेवाडी, ता. पाटण, जि. सातारा येथील प्रतिवादी क्र. ५ यांची शेतजमीन शासनाने उत्तरमांड मध्यम प्रकल्पासाठी संपादीत केली आहे. प्रतिवादी क्र. ५ यांना संपादन झालेल्या क्षेत्राबाबत पुनर्वसन अधिनियम १९८६ अन्वये जमिनीचे वाटप करण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्याप्रमाणे शासनातर्फे संकलन यादी तयार होऊन त्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ यांना मौजे माजगांव येथील भूमापन क्र. ३८४ मधील ० हेक्टर ८० आर क्षेत्र देण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, कराड यांचा आदेश क्र. उत्तरमांड/का.वि./१५, दिनांक २२/०१/२०१० नुसार प्रतिवादी क्र. ५ यांना जमीन मंजूर केली. शासनाने भुसंपादनाच्या सर्व प्रक्रिया कायदेशीररीत्या राबवून दिनांक २६/०४/२०१३ रोजी भूमापन क्र. ३८४ बाबत प्रतिवादी क्र. ५ यांना कब्जेपट्टी करुन दिली आहे व त्याच दिवशी सदर ० हेक्टर ८० आर इतक्या क्षेत्राचा कब्जा वादींकडून काढून प्रतिवादी क्र. ५

यांना दिला आहे. उपविभागीय अधिकारी, कराड यांच्या आदेशावरुन व कब्जेपट्टीवरुन भूमापन क्र. ३८४ बाबत फेरफार क्र. १४६२ होऊन प्रतिवादी क्र. ५ चे नाव दावा मिळकतीच्या महसूल दप्तरी दाखल झाले आहे. उपविभागीय अधिकारी, कराड यांनी प्रतिवादी क्र. ५ यांना सदर क्षेत्र मंजूर करतेवेळी ज्या अटी व शर्थी नमूद केल्या आहेत त्या अटीच्या अधीन राहून प्रतिवादी क्र. ५ हे सदरची मिळकत कोणासही हस्तांतर करणार नाही. प्रतिवादी क्र. ५ ने त्यांच्या कैफीयतीमध्ये वादींचा तुर्तातुर्त अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

९) वादींच्या विद्वान वकीलांनी निशाणी क्र. ५ कडील अर्जावर दिनांक १०/०१/२०२४ रोजी असे लिहीले आहे की, सदरील प्रतिवादी क्र. ५ यांनी निशाणी ३४ येथे दावा मिळकत विक्री करणार नसल्याबाबत undertaking दिले असल्याने सदरचा अर्ज तुर्त वादीस चालविण्याचा नाही. त्यानंतर वादींच्या विद्वान वकीलांनी दिनांक २६/०७/२०२४ रोजी प्रस्तुतच्या निशाणी क्र. ५ कडील अर्जावर युक्तीवाद केला आहे.

१०) प्रस्तुतच्या निशाणी क्र. ५ कडील अर्जाच्या कामी वादींतर्फे विद्वान वकील श्री ए. आर. डांगे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी प्रतिवादी क्र. ५ यांना व त्यांच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. ५ तर्फे युक्तीवाद नाही असा आदेश दिनांक ०९/०८/२०२४ रोजी पारीत केला आहे.

११) वादींच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता व अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता निशाणी क्र. ५ कडील अर्जाच्या निकालाकरीता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होत असुन त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी सकृत दर्शनी प्रकरण न्यायालयासमोर आणले आहे का ? | होय. |
| २. | न्यायाचा तराजु कोणाच्या बाजुस झुकता आहे ? | वादींच्या. |
| ३. | सदरचे अर्जाचे कामी अपरिमित नुकसान कोणाचे होईल ? | वादींचे. |
| ४. | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ च्या संदर्भात :–**

१२) निशाणी क्र. १० कडील फेरफार क्र. १४६२ च्या उताऱ्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर फेरफार उताऱ्यामधील नोंदीनुसार उपविभागीय अधिकारी, उपविभाग कराड यांच्याकडील आदेश क्र. उत्तरमांड/का.वि./१५, २२/०१/२०१० झालेवरुन प्रकल्पग्रस्त खातेदार सुरेंद्र धोंडीराम पवार यांना मौजे माजगांव येथील गट क्र. ३८४ मधील ८० आर क्षेत्र वाटप करण्यात आले आहे.

१३) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार मौजे माजगांव, ता. पाटण येथील शेतजमीन गट क्र. ३८४, क्षेत्र ३ हेक्टर १६ आर, पोटखराब ० हेक्टर ४ आर ही मिळकत वादींची वडीलोपार्जित मालकी हक्क कब्जेवहीवाटीची मिळकत आहे. सदर मिळकत ही वादींचे वडील नथु गणपती पाटील यांच्या नावे सन २०१२ अखेरपर्यंत होती. वादींच्या वडीलांच्या नावे असलेल्या दावा मिळकतीच्या संपादनाबाबत विशेष भुसंपादन अधिकारी क्र. १२, सातारा यांनी भूसंपादन कायद्याचे कलम ४(१) ची नोटीस दिनांक १३/१२/२०११ रोजी

दिली होती. परंतु दरम्यानच्या कालावधीत भूसंपादन कार्यालय १२ हे बंद झाल्याने माजगांव येथील संपादनाचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, उपविभाग पाटण यांच्याकडे वर्ग करण्यात आला. उपविभागीय अधिकारी, उपविभाग पाटण यांनी कलम ४ ची अधिसूचना दिनांक १ जुलै २०१३ रोजीच्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध केली. परंतु त्यानंतर कलम ६ प्रमाणेची अधिसूचना मुदतीत प्रसिद्ध झाली नसल्याने संपादनाचा प्रस्ताव व्यपगत झाला. शासनाने दावा मिळकत कायदेशीररीत्या संपादन न करता उपविभागीय अधिकारी, उपविभाग कराड यांचा कार्यालयीन आदेश क्र. उत्तरमांड/का.वि./१५/२२/०१/२०१० नुसार सन २०१३ साली दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. ५ यांचे वडील सुरेंद्र धोंडीराम पवार यांना बेकायदेशीररित्या वाटप केली आहे. वादींच्या सदर कथनांच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. ५ च्या निशाणी क्र. ३१ कडील कैफीयतीमधील कथनांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ५ च्या कैफीयतीमधील कथनानुसार शासनाने भूसंपादनाच्या सर्व प्रक्रिया कायदेशीररीत्या राबवून दिनांक २६/०४/२०१३ रोजी भूमापन क्र. ३८४ बाबत प्रतिवादी क्र. ५ यांना कब्जेपट्टी करुन दिली आहे व त्याच दिवशी सदर ० हेक्टर ८० आर इतक्या क्षेत्राचा कब्जा वादींकडून काढून प्रतिवादी क्र. ५ यांना दिला आहे. उपविभागीय अधिकारी, कराड यांच्या आदेशावरुन व कब्जेपट्टीवरुन भूमापन क्र. ३८४ बाबत फेरफार क्र. १४६२ होऊन प्रतिवादी क्र. ५ चे नाव दावा मिळकतीच्या महसूल दप्तरी दाखल झाले आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ महाराष्ट्र शासनतर्फे जिल्हाधिकारी, सातारा, प्रतिवादी क्र. २ उपजिल्हाधिकारी पुनर्वसन, सातारा, प्रतिवादी क्र. ३ उपविभागीय अधिकारी, उपविभाग पाटण, प्रतिवादी क्र. ४ उपविभागीय अधिकारी, उपविभाग कराड यांनी निशाणी क्र. ३३ कडे दाखल केलेल्या कैफीयतीमध्ये असे कथन केले आहे की, मौजे माजगांव, ता. पाटण येथील गट क्र. ३८४ हा नथु गणपती पाटील यांच्या नावे होता. सदर गटातील ०.८० हेक्टर आर क्षेत्र प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी

प्रस्तावित करण्यात आले होते. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांच्या कैफीयतीममध्ये पुढे असे कथन केले आहे की, गट क्र. ३८४ मधील ८० आर या क्षेत्राची संपादन प्रक्रिया सन २०१० मध्ये सुरु करण्यात आली होती. परंतु ती पुर्णत्वास जाऊ शकलेली नाही. तसेच नवीन भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार देखील सदर गटाचे संपादन झाल्याचे दिसून येत नाही. तसेच खाजगी वाटाघाटीद्वारे देखील सदर जमीनीची संपादन प्रक्रिया पुर्ण झालेली नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांच्या कैफीयतीमध्ये केलेली वरील नमूद कथने वादींच्या या कथनास पुष्टी करतात की, दावा मिळकत कायदेशीररीत्या संपादन न करता उपविभागीय अधिकारी, उपविभाग कराड यांचा कार्यालयीन आदेश क्र. उत्तरमांड/का.वि./१५, २२/०१/२०१० नुसार सन २०१३ साली दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.५ यांचे वडील सुरेंद्र धोंडीराम पवार यांना वाटप केली आहे. याउलट मौजे माजगांव, ता. पाटण येथील गट क्र. ३८४ मधील ८० आर क्षेत्राच्या भूसंपादनाची प्रक्रिया शासनाने पुर्ण केली असल्याबाबतचा सकृतदर्शनी पुरावा प्रतिवादी क्र. ५ ने अभिलेखावर आणला नाही. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते वादींनी या कामी असे सकृतदर्शनी प्रकरण न्यायालयासमोर आणले आहे की, मौजे माजगांव येथील गट क्र. ३८४, क्षेत्र ३ हेक्टर १६ आर व पोट खराब ० हेक्टर ४ आर ही मिळकत वादींचे वडील नथु गणपती पाटील यांच्या नावे होती व शासनाने सदर मिळकतीपैकी ८० आर क्षेत्र कायदेशीररीत्या संपादन न करता उपविभागीय अधिकारी, उपविभाग कराड यांचा कार्यालयीन आदेश क्र. उत्तरमांड/का.वि./१५, २२/०१/२०१० नुसार सन २०१३ साली प्रतिवादी क्र. ५ यांचे वडील सुरेंद्र धोंडीराम पवार यांना वाटप केली आहे.

१४) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्र. ५ यांनी दावा मिळकत विक्रीस काढली आहे. प्रतिवादी क्र. ५ यांनी दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री केल्यास वादींचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे.

वर चर्चा केल्याप्रमाणे वादींनी या कामी असे सकृतदर्शनी प्रकरण न्यायालयासमोर आणले आहे की, मौजे माजगांव येथील गट क्र. ३८४, क्षेत्र ३ हेक्टर १६ आर व पोट खराब ० हेक्टर ४ आर ही मिळकत वादींचे वडील नथु गणपती पाटील यांच्या नावे होती व शासनाने सदर मिळकतीपैकी ८० आर क्षेत्र कायदेशीररीत्या संपादन न करता उपविभागीय अधिकारी, उपविभाग कराड यांचा कार्यालयीन आदेश क्र. उत्तरमांड/का.वि./१५, २२/०१/२०१० नुसार सन २०१३ साली प्रतिवादी क्र.५ यांचे वडील सुरेंद्र धोंडीराम पवार यांना वाटप केली आहे. अशा परिस्थितीत माझ्या मते प्रस्तुत दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र. ५ ने दावा मिळकत त्रयस्थ इसमास हस्तांतरीत केल्यास वादींचे अपरीमीत नुकसान होऊ शकते. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते या अर्जाच्या कामी न्यायाचा तराजु वादींच्या बाजुस झुकता आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष वरीलप्रमाणे नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात</u> :-**

१५) वर चर्चा केल्याप्रमाणे वादींनी या कामी असे सकृतदर्शनी प्रकरण न्यायालयासमोर आणले आहे की, मौजे माजगांव येथील गट क्र. ३८४, क्षेत्र ३ हेक्टर १६ आर व पोट खराब ० हेक्टर ४ आर ही मिळकत वादींचे वडील नथु गणपती पाटील यांच्या नावे होती व शासनाने सदर मिळकतीपैकी ८० आर क्षेत्र कायदेशीररीत्या संपादन न करता उपविभागीय अधिकारी, उपविभाग कराड यांचा कार्यालयीन आदेश क्र. उत्तरमांड/का.वि./१५, २२/०१/२०१० नुसार सन २०१३ साली प्रतिवादी क्र.५ यांचे वडील सुरेंद्र धोंडीराम पवार यांना वाटप केली आहे. तसेच वर चर्चा केल्याप्रमाणे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, प्रस्तुत दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र. ५ ने दावा मिळकत त्रयस्थ इसमास हस्तांतरीत केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होऊ शकते. तसेच वर चर्चा केल्याप्रमाणे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, या कामी न्यायाचा तराजू वादींच्या बाजूस झुकता आहे. त्यामुळे

वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते वादी हे दावा मिळकतीच्या हस्तांतरणाबाबत प्रतिवादी क्र. ५ विरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) याद्वारे असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येतो की, प्रस्तुत दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र. ५ ने दावा मिळकत कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करु नये.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.08.21 17:34:18 +0530

दिनांकः– २१/०८/२०२४ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.